# INTERNATIONAL INDIAN SCHOOL, DAMMAM
## MIDDLE SECTION
### ANNUAL EXAM (MARCH- 2018)

**CLASS - VII** **SUBJECT: MARATHI** **DURATION: 3 Hours**

**MARKS: _______/80**

**Instructions:**

1. **Read questions carefully and attempt all.**
2. **Recheck your paper thoroughly before submission.**

**प्र.१] रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **[1 x 10=10]**

१. शोर्यकथा झलकारी या धड्याचे लेखक------------ आहे. (वि. गो. भागवत / वि. दा. पिंगळे)
२. यशवंत देव हे ---------- या कवितेचे कवी आहे. (पुसू नका / हिरवे हिरवे)
३. एकच ---------- या सर्वांचा नाव तयाचे पुसू नका. (कळी / माळी)
४. चिमणी उडत उडत पप्पूच्या -------------- येऊन बसली. (खांद्यावर / डोक्यावर)
५. ---------आल्यावर पप्पू चिमणी व तिचे पिल्ले यांच्यातच गुंतून जायचा (खेळून /शाळेतून)
६. उद्यानातील -----------त्याचा रंग कोणता पुसू नका. ( फुलास / फळास)
७. जात कोणती पुसू नका ---------कोणता पुसू नका. ( पंथ / धर्म )
८. राणीला ही सर्व ---------- कळली. ( बातमी / हकीगत)
९. एका ----------- सरळ तिच्या अंगावर झेप घेतली. ( वाघास / चित्त्याने )
१०.झलकारी एकनिष्ठ व ------------ बाण्याची होती. ( अभिमानी / स्वाभिमानी )

**प्र.२] शब्दार्थ लिहा. (Any 5)** **[1 x 5= 5]**

१.जतन २.सद्धर्म ३.श्रेष्ठ ४.उदास ५.दयाळू ६.बलिदान करणे

**प्र.३] समानार्थी शब्द लिहा: (Any 5)** **[1 x 5= 5]**

१. निश्चय २.मित्र ३.माता ४.सुमन ५.सत्कार ६.प्रतिकार

**प्र.४] विरुद्धार्थी शब्द लिहा: (Any 5)** **[1 x 5=5]**

१.यश २.मित्र ३.काळ्या ४.रडणे ५.सुगंध ६.सुटका

**प्र.५] लिंग बदला:** **[½ x 6= 3]**

१.पट्टा २.कवियित्री ३.पक्षी ४.देव ५.चित्ता ६.वीर

**प्र.६] वचन बदला:** **[½ x 6= 3]**

१. बक्षिसे २.तलवार ३.पिल्ले ४.मंदिर ५.पलटण ६.मोळ्या

**प्र.७] खालील शब्द शुदध करुन लिहा.** **[½ x 4= 2]**

१.पाउस २. हीरवा ३.परोपकारि ४.नीश्चय

**प्र.८] वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा ((Any 2)** **[2 x 2= 4]**

१. नवल घडणे २. धक्का बसणे ३. चाल करणे

**प्र.९] योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पून्हा लिहा.** **[¼ x 6= 1½]**

१. राणी म्हणाली तू लहान असलीस तरी तुझ्यातील शोर्य धैर्य पराक्रम हे गुण मोठे आहेत

**प्र.१०] कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **[½ x 5= 2½]**

१. "ते तर मी काढून टाकलं, बाहेर फेकून दिलं."

२. "आई, आई, माझ्या चिमणीचं घरटं त्याच्या जागेवर नाही!."

३. "तू लहान असलीस तरी तुझ्यातील शोर्य, धैर्य, पराक्रम हे गुण मोठे आहेत".

४. "ब्रिटीश सरकार तुझा मानसन्मान करून मोठी रक्कम देणार आहे".

५.. "तुम्ही मला फाशी दिली तरी चालेल, पण हे गुपित मी बिलकुल सांगणार नाही"

**प्र.११] कवितेतील कडव्याच्या ओळी पूर्ण करा.** **[¼ x 8= 2]**

हिरवे हिरवे ------------ ------------

------------------ सगळीकडे |

हिरव्या ------------- पळू लागल्या

------------------ डोंगरकडे |

हिरव्या रानी, हिरवी -----------

हिरवी --------- -------------|

**प्र.१२] खालील वाक्यांचा काळ ओळखा.** **[½ x 4= 2]**

१. मी महिलांची पलटण काढण्याचा विचार करत आहे.

२. चित्याने झलकारीच्या अंगावर झेप घेतली.

३. झलकारी ताडकन उतरली.

४. तुम्ही मला फाशी दिली तरी चालेल.

**प्र.१३] जोड्या लावा.** **[½ x 4= 2]**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) कान देऊन ऐकणे | अ) सूड घेणे |
| २) बदला घेणे | ब) विरोध करणे |
| ३) प्रतिकार करणे | क) तयार ठेवणे |
| ४) सज्ज ठेवणे | ड) लक्ष्य पूर्वक ऐकणे |

**प्र.१४] चूक की बरोबर ते लिहा.** **[½ x 4= 2]**

१. झाशी उत्तर प्रदेशातील एक गाव आहे.

२. जूल्हादने राणीशी बंडखोरी केली होती.

३. झलकारीला राणीने सल्ला दिला.

४. स्वयंपाकखोलीतील घरटे आईने बाहेर फेकले.

**प्र.१५] का ते लिहा.** **[1 x 2= 2]**

१. ब्रिटीश सेनापतीने झाशीला वेध दिला.

**प्र.१६] एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[1 x 8= 8]**

१. कवी मुलांना कोणता निर्णय करण्यास सांगत आहे?

२. मित्र कोणाला म्हटले आहे?

३. चिमणा व चिमणी घरटे कोठे बांधत होती?

४. घरटे बांधण्यासाठी चिमणा व चिमणी ने कोणत्या वस्तू आणल्या?

५. मंगलधाम कशास म्हटले आहे?

६. कवीने कोणता मंत्र जपावयास सांगितला आहे?

७. जंगलात झलकारीवर कोणी हल्ला केला?

८. झलकारी कोणत्या बाणाची होती?

**प्र.१७] थोडक्यात उत्तरे लिहा. (Any 2)** **[3 x 2= 6]**

१. झाडाला परोपकारी मित्र का म्हटले आहे?

२. कवीने काय विचारू नका असे म्हटले आहे?

३. झलकारीचा पराक्रम पाहून झाशीच्या राणीने कशाप्रकारे सन्मान केला?

**प्र.१८] खालील कविता वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[1 x 5= 5]**

आकाश जर आरसा असते,
किती छान झाले असते!
सर्व जगाचे प्रतिबिंब,
स्पष्ट त्यात पडले असते
सुंदर निर्मळ देखावे,
बसल्याजागी पहिले असते;
कोठे काय चालले आहे,
चट्टदिशी कळले असते.
रात्र कधीच पडली नसती,

अष्टौप्रहर दिसले असते;
सुरेख अशा आरसेमहालात,
जग मजेत जगले असते.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कवी आरशाला काय असण्यास म्हणतो आहे?
२. आकाशरूपी आरशात कोणाचे प्रतिबिंब पडले असते?
३. कवीला बसल्याजागी काय पहायला मिळाले असते?
४. सुरेख अशा आरसेमहालात कोण मजेत जगले असते?
५. रात्र कधीच पडली नसती तर काय दिसले असते?

**प्र.१९] उतारा वाचा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[1 x 5= 5]**

**"राष्ट्रपती भवन"**

**"राष्ट्रपती भवन"** हे भारताची राजधानी दिल्ली येथे आहे. या भवना मध्ये भारताचे राष्ट्रपती राहतात. त्याचप्रमाणे इतर राष्ट्रनेत्यांचे व प्रमुख अतिथींचे देखील आदरातीर्थ्य स्थान आहे. भारतातील सर्वोच्च मुलकी अधिकारी क्याबिनेट सेक्रेटरी यांचे कार्यालय हे राष्ट्रपती भवनात असते. राष्ट्रपती भवनाच्या अगदी समोरच एक लोखंडी खांब आहे ह्यास 'जयपूर स्तंभ' असे म्हटले जाते. तसेच इतर महत्त्वाच्या सरकारी कार्यक्रम अशोक हॉल व दरबार हॉल येथे नियोजित केले जातात. राष्ट्रपतींसाठी घोड्स्वार सैनिकांची एक खास पथक योजिले आहे. राष्ट्रपती भावना समोरून जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा सुंदर बगीचा, तलाव व कारंजा आहेत. त्या रस्त्यालाच 'राजपथ' असे म्हणतात. त्याचप्रमाणे केंद्रीय मंत्रीमंडळाची निवड झाल्यांनतर त्यांचा शपथविधी येथेच होतो व पद्म पुरस्कार सन्मान सोहळा मध्ये भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री इ. पुरस्कार हे राष्ट्रपतींच्या हस्ते दिले जातात .

**प्रश्न:**

१. राष्ट्रपती भवन हे कुठे आहे?
२. 'जयपूर स्तंभ' कशास म्हटले जाते?
३. सरकारी कार्यक्रम कुठे नियोजित केले जातात?
४. 'राजपथ' कशास म्हणतात?
५. राष्ट्रपतींच्या हस्ते कोणते पुरस्कार दिले जातात ?

**प्र.२०] पत्रलेखन** **[1 x 5= 5]**

**मुख्याध्यापकास सुट्टीसाठी परवानगी मागणारे पत्र लिहा.**